**प्रेसनोट** दिनांक : 15/9/2017

## पोलीस ठाणे बिडकीन यांची अवैद्य धंदयाविरुध्द धडक मोहिम

दिनांक 14/9/2017 रोजी सपोनि पंडीत सोनवणे हे सकाळी शासकिय कामानिमित्त औरंगाबाद जात असताना चितेगांव येथे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की इमामपुरवाडी ता.पैठण शिवारात दोन वाहने विनापरवाना बेकायदेशिररित्या गौण खनिज वाळुची चोरी करुन अवैदय विक्री करणेसाठी जात आहे. त्यावरुन त्यांनी पो.स्टे.ला कळवुन पोनि गाडे यांनी सदर ठिकाणी पोना/526 सोनवणे, पोना/1147 चव्हाण, पोना/313 तोडकर यांना सदर ठिकाणी पाठविले. नमुद ठिकाणी हायवा टिप्पर क्रमांक एमएच/20/अेटी/ 7726 हयाचेमध्ये 4 ब्रास रेती व वाहन असा 8,16,000/- रु.चा माल मिळुन आला म्हणुन नमुद वाहनाचा फरार झालेला अज्ञात चालक व मालक मोहन सुखदेव घुंगारडे रा.पैठणखेडा तसेच टाटा टेम्पो क्रमांक एमएच-20 सीटी-6839 हा एक ब्रास रेती व वाहनासह रु.2,03,000 चा माल मिळुन आल्याने चालक व मालक आरोपी संतोष शाहु घायाळ रा.इमामपुरवाडी ता. पैठण विरुध्द पो.ठाणे बिडकीन येथे गुरनं 367/2017 कलम 379 भादंवि व गुरनं 368/2017 कलम 379, 109 भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रा. श्रीमती डॉ.आरती सिंह, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती उज्वला वनकर, श्री स्वप्नील राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी पैठण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एस.व्ही.गाडे, सपोनि पंडीत सोनवणे, पोलीस नाईक अभिजित सोनवणे, राजेश चव्हाण व पोकॉ संतोष तोडकर यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस जमादार प्रकाश शिंदे हे करीत आहे.

**पोलीस निरीक्षक**
**पोलीस ठाणे बिडकीन**